पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १८१**

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक – **०४/०८/२०१५** वेळ – **सकाळी ११.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक ०४/०८/२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे - सभापती**
२) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
३) मा.गायकवाड संध्या सुरदास
४) मा.भालेकर शांताराम कोंडीबा ऊर्फ एस.के.बापु
५) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
६) मा.तरस बाळासाहेब जयवंत
७) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८) मा.प्रसाद शेट्टी
९) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
१०) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
११) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
१२) मा.काळे विमल रमेश
१३) मा.अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार
१४) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.डोईफोडे-सहा.आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.कडूसकर,मा.खोसे-सहा.आयुक्त,मा.निकम,मा.सवणे,मा.थोरात,मा.गायकवाड-कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले –</u>**

विषय क्रमांक १२) :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका, जलशुद्धीकरण केंद्र से.क्र.२३ येथे पाणी शुद्धीकरण प्रक्रियेसाठी द्रवरुप स्वरुपातील पॉली अल्युमिनिअयम क्लोराईड व पावडर पॉली अल्युमिनियम क्लोराईड पुरविणेबाबत...

विषय क्रमांक १३) :- सांगवी किवळे या बीआरटीएस रस्त्यावरील काळेवाडी फाटा ते डांगे चौक दरम्यान लक्ष्मण नगर येथील नव्याने बांधणेत येणा-या सबवेस अडथळा करणारी १३२ के.व्ही.टॉवर लाईन हलविणेकामी महापारेषण कंपनीचे वीजपर्यवेक्षण शुल्क अदा करणेबाबत...

विषय क्रमांक १४) :- रक्कम अदा करणेबाबत...

विषय क्रमांक १५) :- JnNURM-BSUP योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या अजंठानगर येथील A6 इमारतीचे पात्र लाभार्थ्यांना मा.महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या हस्ते सदनिका हस्तांतरण करणेचे कार्यक्रमास मंडप व्यवस्था करणेच्या कामास तसेच याकामी झालेला खर्च तरतूद वर्गीकरणास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत…

विषय क्रमांक १६) :- पशुजन्म नियंत्रण कार्यक्रम राबविणेबाबत…

विषय क्रमांक १७) :- मा.सत्तारुढ पक्षनेता यांचे वापरातील म.न.पा. वाहनाकरीता ट्युबलेस टायर्स खरेदीकामीचे खर्चास मान्यता देणेबाबत…

विषय क्रमांक १८) :- मा.विरोधी पक्षनेता यांचे वापरातील म.न.पा. वाहनाकरीता ट्युबलेस टायर्स खरेदीकामीचे खर्चास मान्यता देणेबाबत…

विषय क्रमांक १९) :- प्र.क्र.५४, पिंपळे निलख भांडे इमारतीमधील व्यायामशाळा नवयुग मित्र मंडळ या संस्थेस ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव…

विषय क्रमांक २०) :- उपहारगृह चालविण्यास देणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव…

विषय क्रमांक २१) :- सल्लागाराची नेमणूक करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव…

विषय क्रमांक २२) :- कै.हरीभाऊ दिनाजी वाघेरे उद्यान देखभाल व संरक्षण करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव…

विषय क्रमांक २३) :- सांगवी जलतरण तलाव येथील मोकळ्या हॉलमध्ये प्लॅस्टीक खुर्च्या उपलब्ध करुन देणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव…

विषय क्रमांक २४) :- तरतूद वर्गीकरण करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव…

विषय क्रमांक २५) :- तरतूद वर्ग करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव…

विषय क्रमांक २६) :- तरतूद वर्गीकरण करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव…

विषय क्रमांक २७) :- सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव…

विषय क्रमांक २८) :- सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील क प्रभाग व क मुख्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव…

विषय क्रमांक २९):- सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील क प्रभाग व क मुख्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव…

विषय क्रमांक ३०):- सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील फ क्षेत्रीय कार्यालयातील प्रभागातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत- मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव…

विषय क्रमांक ३१):- सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील अ प्रभाग व अ मुख्यालयातील कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३२):- सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील ड मुख्यालयातील विशेष योजना कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३३):- सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील ड मुख्यालयातील विशेष योजना कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३४):- सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत-मा.कैलासभाऊ थोपटे,मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३५):- सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील ड मुख्यालयातील प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव मधील भांडवली व विशेष योजना कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत-मा.कैलासभाऊ थोपटे,मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३६):- सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील ड मुख्यालयातील प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव मधील भांडवली व विशेष योजना कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत-मा.कैलासभाऊ थोपटे,मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३७):- ठ.क्र.११७०२ दि.९/६/२०१५ रद्द करणे व अंदाजपत्रकात वाढ/घट मंजुर करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे,मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३८):- ठ.क्र.११७०२ दि.९/६/२०१५ रद्द करणे व अंदाजपत्रकात वाढ/घट मंजुर करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे,मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३९):- ठ.क्र.१२०३० दि.२१/७/२०१५ रद्द करणे व अंदाजपत्रकात वाढ/घट मंजुर करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे,मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४०):- ठ.क्र.१२०४६ दि.२१/७/२०१५ रद्द करणे व तरतुद वर्गीकरण करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे,मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४१):- ठ.क्र.१२०२४ दि.२१/७/२०१५ रद्द करणे व तरतुद वर्गीकरण करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे,मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४२):- ठ.क्र.१२०४१ दि.२१/७/२०१५ रद्द करणे व तरतुदीत फेरबदल करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे,मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४३):- ठ.क्र.१२०४५ दि.२१/७/२०१५ रद्द करणे व तरतुदीत फेरबदल करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे,मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४४):- पिं.चिं.मनपाच्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात प्रस्तावात नमूदप्रमाणे वाढ/घट मंजूर करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे,मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४५):- सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील ड क्षेत्रिय कार्यालयातील स्थापत्य विभागातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे,मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४६):- ठ.क्र.११७०३ दि.९/६/२०१५ रद्द करणे व तरतुदीत फेरबदल करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे,मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४७):- दि.१९ ऑगस्ट रोजी निसर्गकवी बहिणाबाई चौधरी सर्पोद्यानात नागपंचमी साजरी करणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे,मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४८):- मनपाचे उद्यान विभागास हार,फुले,गुच्छ इ. साहित्य पुरविणेबाबत – मा.संध्या गायकवाड, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४९):- जलशुद्धीकरण केंद्र से.२३ आवारातील मनपा कर्मचा-यांच्या निवासस्थानांच्या थकबाकी विजदेयकांची अदायगी व नव्याने विज मिटर घेण्यास प्रत्यक्ष येणा-या खर्चास मंजुरी देणेबाबत - मा.कैलासभाऊ थोपटे,मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ५०):- वाढ/घट करणेबाबत-मा.कैलासभाऊ थोपटे,मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

--------

खालीलप्रमाणे सूचना मांडण्यात आली.

सूचक – मा.विनायक गायकवाड अनुमोदक – मा.संपत पवार

मा.स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक ०४/०८/२०१५ रोजी सकाळी ११.४५ वा. पर्यंत तहकूब करण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**मा.सभापती** - सभा मंगळवार दिनांक ०४/०८/२०१५ रोजी सकाळी ११.४५ वा. पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिति

**कार्यपत्रिका क्रमांक - १८१**

**सभावृत्तांत**

**(०४.०८.२०१५ (सकाळी ११.०० वा.) ची तहकूब सभा)**

दिनांक – **०४/०८/२०१५** वेळ – **सकाळी ११.४५ वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक **०४/०८/२०१५** सकाळी ११.००ची तहकूब सभा मंगळवार दिनांक ०४/०८/२०१५ रोजी सकाळी **११.४५** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे - सभापती**
२) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
३) मा.गायकवाड संध्या सुरदास
४) मा.भालेकर शांताराम कोंडीबा ऊर्फ एस.के.बापु
५) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
६) मा.तरस बाळासाहेब जयवंत
७) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८) मा.प्रसाद शेट्टी
९) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
१०) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
११) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
१२) मा.काळे विमल रमेश
१३) मा.अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार
१४) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना,मा.भोसले-मुख्य लेखापाल,मा.गावडे-सहआयुक्त,मा.पाटील,मा.चव्हाण,मा.तुपे–सह शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.डोईफोडे,मा.कडूसकर,मा.गायकवाड,मा.खांडकेकर, मा.दंडवते, मा.माछरे,मा.फुंदे,मा.दुरगुडे,मा.खोसे-सहा.आयुक्त,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.उबाळे-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.पोमण-संगणक अधिकारी,मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे,मा.चव्हाण,मा.कपिले,मा.थोरात,मा.पठाण,मा.लडकत,मा.खाबडे,मा.पिरजादे,मा.दांगट,मा.बरशेट्टी, मा.गलबले,मा.घोडे,मा.ओंभासे,मा.गट्टूवार,मा.शेख,मा.गायकवाड-कार्यकारी अभियंता,मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी,मा.बोदाडे,मा.बैंडे-प्रशासन अधिकारी,मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी,मा.लावंड-कायदा अधिकारी, मा.ऐवले-समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक – मा.कैलासभाऊ थोपटे　　　　　　　　　　　　　　　अनुमोदक – मा.शांताराम भालेकर

पिंपरी चिंचवड म.न.पा.चा स्मार्ट सिटीमध्ये समावेश झाल्याने याकामी मोलाची कामगिरी बजावणारे, मा.श्री.राजीव जाधव आयुक्त, मा.एम.टी. कांबळे प्र.शहर अभियंता, मा.राजन पाटील सहशहर अभियंता, मा.निळकंठ पोमण संगणक अधिकारी व अन्य सर्व अधिका-यांचे अभिनंदन करण्यात यावे.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

--------

**मा.सभापती** - पिंपरी चिंचवड म.न.पा.चा स्मार्ट सिटीमध्ये समावेश झाल्याने याकामी मोलाची कामगिरी बजावणारे, मा.श्री.राजीव जाधव आयुक्त, मा.एम.टी. कांबळे प्र.शहर अभियंता, मा.राजन पाटील सहशहर अभियंता, मा.निळकंठ पोमण संगणक अधिकारी व अन्य सर्व अधिका-यांचे अभिनंदन करणेत येत आहे.

--------

ठराव क्रमांक – १२०८९　　　　　　　　　　विषय क्रमांक – १
दिनांक – ०४/०८/२०१५　　　　　　　　　　विभाग – जलशुद्धीकरण केंद्र से.२३
सुचक-मा.रमा ओव्हाळ　　　　　　　　　　अनुमोदक–मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/जशुके/२८४/२०१५ दि.२१/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका जलशुध्दीकरण केंद्र से.क्र.२३ येथे पाणी शुध्दीकरण प्रक्रियेसाठी द्रवरुप स्वरुपातील पॉली अल्युमिनियम क्लोराईड व पावडर स्वरुपातील पॉली अल्युमिनियम क्लोराईडचा पुरविणे या कामाचा आदेश देण्यात आला आहे. सदर निविदेत मे.एस.व्ही.एस. केमिकल व मे.केमिकल पिपल यांना अनुकमे ६०% व ४०% प्रमाणे परिमाण पुरवणे आदेश देण्यात आले आहे. निविदा अटी व शर्तीनुसार आवश्यकता असल्यास निविदा दराने ५० % जादा परिमाण पुरविणेची अट निविदेमध्ये घेणेत आलेली आहे. यावर्षासाठी पी.ए.सी. लिक्विड व पावडर खरेदी करणेसाठी अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. चालू निविदेतील करारनामा नुसार ठेकेदार यांनी वाढीव ५० % पी.ए.सी. लिक्विड व पावडर आहे त्याच निविदा दराने म्हणजेच अनुक्रमे लिक्विड पी.ए.सी. चा दर र.रु.१२,६००/- प्रति मे.टन व पावडर पी.ए.सी. चा दर र.रु.३१,१५० प्रति मे.टन असे देणे बंधनकारक आहे. पावसाळ्याच्या काळात अशुध्द पाण्यामध्ये वाढलेली गढूळता कमी करण्यासाठी चालू निविदेतील पावडर स्वरुपातील पॉली अल्युमिनियम क्लोराईडचा ५० % वाढीव पुरवठा निविदा अटी व शर्तीप्रमाणे निविदा दराने घेणे आहे. त्याअनुषंगाने मे.एस.व्ही.एस. केमिकल कार्पोरेशन यांच्याकडून पावडर PAC च्या २०८.२० मे.टन परिमाणाच्या ५० % वाढीव पुरवठा म्हणजेच १०४.१० मे.टन पुरवठा घेणे आवश्यक आहे. त्यानूसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा पुरवठा आदेशामधील दराप्रमाणे १)एस.व्ही.एस. केमिकल कार्पोरेशन यांना ५० % वाढीव पावडर पॉली अल्युमिनियम क्लोराईड चे परिमाण (१०४ मे.टन) पुराविणेचा आदेश देणे आवश्यक असल्याने त्यास होणारा एकूण खर्च (१०४ मे.टन X र.रु.३१,१५०/- प्रति मे.टन = र.रु.३२,३९,६००/- इतका असून त्यास मान्यता मिळणे आवश्यक आहे. पावसाळ्यातील जास्तीचा गढूळपणा कमी करण्यासाठी पावडर स्वरूपातील पी.ए.सी. चा पुरवठा घेणेची निकड लक्षात घेता उपरोक्त १ प्रमाणे

मे.एस.व्ही.एस.केमिकल कार्पोरेशन यांना ५०% वाढीव परिमाणाचे पुरवठा आदेश ठेकेदारास देणे करिता व त्यास होणा-या खर्चास र.रु.३२,३९,६००/- (अक्षरी र.रू. बत्तीस लाख एकोणचाळीस हजार सहाशे) यांस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०९० विषय क्रमांक – २

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – ड क्षेत्रिय कार्यालय

सुचक-मा.शांताराम भालेकर अनुमोदक–मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.डक्षे/३/कावि/२७६/१५ दि.१५/७/२०१५

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२/३३-२०१४-१५ अन्वये, प्रभाग क्र.४६ विजयनगर येथील मनपाचे विविध इमारती संडास मुता-या इ. किरकोळ दुरुस्ती व देखभालीची कामे करणेकामी मे.टी ॲन्ड जे इन्फ्रास्ट्रक्चर (नि.र.रु. ९,१०,३६४/- (अक्षरी र.रु.नऊ लाख दहा हजार तीनशे चौसष्ट फक्त) पेक्षा ४८.६० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.४,६७,९२७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कलावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०९१ विषय क्रमांक – ३

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – जलशुद्धीकरण केंद्र से.२३ पाणीपुरवठा

सुचक-मा.बाळासाहेब तरस अनुमोदक–मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/पापु/३०९/२०१५ दि.२४/७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जे.एन.एन.यु.आर.एम. टप्पा १ अंतर्गत शहराच्या ४०% भागात २४ x ७ पाणीपुरवठा योजना राबविणेचे नियोजित केले आहे. सदर योजनेच्या Pre-Tendering कामासाठी ASCI (Administrative Staff College of India, Hyderabad) या संस्थेची सल्लागार म्हणून नेमणूक करणेत आली होती. तरी सदर योजनेसाठी सल्लागाराने सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून केंद्र शासनाकडे त्याचे सादरीकरण करून सदर प्रकल्पास मंजुरी मिळवणेपर्यंतचे काम पूर्ण केले आहे. सदर प्रकल्पास केंद्र शासनाकडून र.रु.१४३.१७ कोटी मंजूर करणेत आलेले आहेत. व या कामासाठी केंद्र शासनाचा र.रु.१७.८९६५ कोटीचा व राज्य शासनाचा र.रु.७.१५८६ कोटीचा पहिला हप्ता महानगरपालिकेस दि.२१ एप्रिल २०१५ रोजी प्राप्त झालेला आहे. तरी, सदर योजने करिता ठेकेदार नेमणेसाठीची निविदा प्रक्रिया व नेमणुकी नंतर लागणारे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारचे कामाकरिता सल्लागार नेमणेसाठी निविदा क्र.१७/१/२०१४-१५ अन्वये निविदा प्रक्रिया राबविणेत आली. या कामासाठी M/s.CRISIL Infrastructure Advisory, M/s.Tandon Urban Solutions Pvt. Ltd., M/s.DRA Consultants Pvt. Ltd., M/s.Pricewaterhouse Coopers Pvt. Ltd. या ४ सल्लागारांच्या निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदा प्रक्रिया हि ८०:२० (८० गुण –Technical Bid व २० गुण-Financial Bid) या प्रकारे करणेत आलेले आहे. या प्रक्रियेंतर्गत M/s.DRA Consultants Pvt. Ltd. व M/s.Tandon Urban Solutions Pvt. Ltd. यांचेच Financial Bid चे पाकीट उघडणेस पात्र ठरत होते व या अनुषंगाने, त्यांचेच Financial Bid चे पाकीट उघडणेत आलेले आहे. M/s DRA Consultants Pvt. Ltd. व M/s.Tandon Urban Solutions Pvt. Ltd. यांचे Technical Bid Evaluation

व Financial Bid Evaluation चे अवलोकन केले असता, सदर निविदा मिळणेकरिता M/s.DRA Consultants Pvt.Ltd. हे सल्लागार जास्त योग्य वाटत आहेत. या अनुषंगाने, कामाची तातडी लक्षात घेता M/s.DRA Consultants Pvt.Ltd. यांनी देऊ केलेल्या र.रु.४,२०,४२,०००/- दरास सदर काम M/s.DRA Consultants Pvt.Ltd. या सल्लागारास देणे योग्य वाटते. तरी, वरील प्रमाणे निविदा क्र.१७/१/२०१४-१५ साठी, जे.एन.एन.यु.आर.एम. टप्पा १ अंतर्गत पिंपरी चिंचवड शहरातील ४० % भागाला २४x७ पाणीपुरवठा योजना राबविणेकरिता, ठेकेदार नेमणेसाठीची निविदा प्रक्रिया व नेमणुकी नंतर लागणारे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारचे कामाकरिता M/s.DRA Consultants Pvt. Ltd. या सल्लागारास त्यांनी दिलेल्या र.रु.४,२०,४२,०००/- (अक्षरी र.रू.चार कोटी वीस लाख बेचाळीस हजार) या दरास तसेच त्यांचेशी करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०९२ विषय क्रमांक – ४
दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक-मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक–मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/३/कावि/६८/२०१५ दि.२२/७/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१९/२०१४-१५ मधील अ.क्र.२४ अन्वये, प्र.क्र. ३४ मधील श्री सावित्रीबाई फुलेशाळा येथे स्थापत्य विषयक कामाची दुरूस्ती करणेकामी मे.डी.डी.कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.९,८०,३५५/- (अक्षरी र.रू. नऊ लाख ऐंशी हजार तीनशे पंचापन्न) पेक्षा ४९.९९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.५,१४,७८९/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०९३ विषय क्रमांक – ५
दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक-मा.अनिता तापकीर अनुमोदक–मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/१/कावि/९८०/२०१५ दि.२८/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.मुख्यालय/HO/६/०१/२०१५/१६ अन्वये, के.एस.बी. चौक ते महावीर चौक या रस्त्यावरील फुटपाथची दुरूस्ती रंगरंगोटी करणे व इतर स्थापत्य विषय कामे करणे (अ) रस्त्यावरील विविध सेवावाहिन्या टाकण्यासाठी खोदलेले चर बुजविणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रु.४२,९१,९७८/- (अक्षरी र.रू. बेचाळीस लाख एक्यान्नव हजार नऊशे अठ्ठयाहत्तर) पेक्षा २१.०२ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.३५,५९,२९४/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फलकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – १२०९४ विषय क्रमांक – ६
दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक-मा.विमल काळे अनुमोदक–मा.संपत पवार
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/१/कावि/९८१/२०१५ दि.२८/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.मुख्यालय/HO/६/०८/२०१५/१६ अन्वये, निगडी-दापोडी रस्त्यावरील विविध सेवा वाहिन्यासाठी खोदलेले चर पुर्ववत करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रु.९३,००,०००/- (अक्षरी र.रू.त्र्यान्नव लाख) पेक्षा २३.००% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.७५,१९,०५०/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०९५ विषय क्रमांक – ७
दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – जलशुद्धीकरण केंद्र से.२३
सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/वि/०४/५४४/२०१५ दि.२७/७/२०१५
विषय- पिं.चिं.म.न.पा.च्या पाणीपुरवठा विभागाकडील शुद्ध अशुद्ध जलउपसा केंद्र, से.क्र.२३ पाणीपुरवठा विभाग या लेखाशिर्षकांमधून भांडवली विषयक कामांसाठी तरतूद वर्गीकरणास मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक ७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०९६ विषय क्रमांक – ८
दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – उदयान/वृक्षसंवर्धन
सुचक-मा.शांताराम भालेकर अनुमोदक–मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/२२२/२०१५ दि.२७/७/२०१५

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.१/२०१५-१६ मधील सन २०१५-१६ या वर्षामध्ये मनपाचे विविध ०५ उदयानातील जुन्या पाईपलाईन दुरूस्ती व नविन बसविणे बाबत मे.स्वामी इलेक्ट्रीक ॲन्ड इरीगेशन्स (कोटेशन रक्कम रूपये १,९९,२०१/- (अक्षरी र.रू.एक लाख पन्नास नव्यानव हजार दोनशे एक फक्त) या ठेकेदाराचे कोटेशन अंदाजपत्रकिय दरापेक्षा -१६ टक्के ही सर्वात कमी दराचे कोटेशन स्विकृत करणेत आले असून प्रस्तुतकामी १ महीना कालावधीसाठी येणारे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०९७ विषय क्रमांक – ९

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – पाणीपुरवठा

सुचक-मा.बाळासाहेब तरस अनुमोदक–मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/३२५/२०१५ दि.२८/०७/२०१५

विषय - प्रभाग क्र.६ डुडुळगाव टाकीवरुन वितरण होणा-या भागात जलवाहिनी टाकणेबाबत...

विषय क्रमांक ९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०९८ विषय क्रमांक – १०

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – पाणीपुरवठा

सुचक-मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक–मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/३२६/२०१५ दि.२८/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.१८/३३/२०१४-१५ मधील अ.क्र.१२ अन्वये, प्रभाग क्र.६ मोशी शिवाजीवाडी येथे रस्त्याच्या कडेने जलवाहिनी टाकणे. वस्ती भागात जलनलिका टाकणेकामी मे.यतीनमणी कन्स्ट्रक्शन (निविदा रक्कम रू.- २७,९८,४०३/- (अक्षरी र.रू. सत्तावीस लाख अठ्ठ्यान्नव हजार चारशे तीन फक्त) पेक्षा २७.०५% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.२१,४३,५०६/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०९९ विषय क्रमांक – ११

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – नगरसचिव

सुचक-मा.अनिता तापकीर अनुमोदक–मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:- मा.नगरसचिव यांचे जावक क्र.नस/१/कावि/७५९/२०१५ दि.३०/७/२०१५

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावासोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

<u>**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले –**</u>

ठराव क्रमांक – १२१०० विषय क्रमांक – १२

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – जलशुद्धीकरण केंद्र से.२३

सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/३६५/२०१५ दि.०१/०८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पावसाळ्यातील जास्तीचा गढूळपणा कमी करण्यासाठी पावडर व द्रवरुप स्वरुपातील पी.ए.सी. चा पुरवठा घेणेची निकड लक्षात घेता प्रस्तावात नमूद १ व २ प्रमाणे मे.केमिकल पीपल्स यांना ५०%

लिक्विड व पावडर पॉली अल्युमिनियम क्लोराईड वाढीव परिमाणाचे पुरवठा आदेश ठेकेदारास देणेकरिता व त्यास होणा-या एकूण खर्चास र.रु.६१,०५,७५०/- यांस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१०१ विषय क्रमांक – १३
दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – विद्युत
सुचक-मा.शांताराम भालेकर अनुमोदक-मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.वि/मु.का/१६३/२०१५ दि.०१/०८/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

सांगवी किवळे या बीआरटीएस रस्त्यावरील काळेवाडी फाटा ते डांगे चौक दरम्यान लक्ष्मणनगर येथील नव्याने बांधणेत येणा-या सबवेस अडथळा करणारी १३२ के.व्ही.टॉवर लाईन हलविणेकामी मनपा निविदेद्वारे करीत असलेले कामावरील महापारेषण कंपनीचे वीजपर्यवेक्षण शुल्क र.रु.२,९४,०८५/- (अक्षरी र.रु.दोन लाख चौ-याण्णव हजार पंच्याऐंशी) फक्त तातडीने अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१०२ विषय क्रमांक – १४
दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – कामगार कल्याण
सुचक-मा.बाळासाहेब तरस अनुमोदक-मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जावक क्र.काक/१/कावि/३५३/२०१५ दि.२९/०७/२०१५

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

Sharp Consultancy Services तर्फे ऍड.धिरज शिंदे चिंचवड, पुणे-३३ यांनी बील क्र. ०४३३/२०१४-१५ चे Bill for documentation, submission & registration under the Maharashtra Contract Labour (Regulation and Aboliation) Rules 1971 R.C.No.1186 Bill for the year 2014 चे र.रु.२८,०९०/- आणि बील क्र.0059/2015-2016 चे Bill for documentation, submission & registration under the Maharashtra Contract Labour (Regulation and Aboliation) Rules 1971 R.C.No.1186 Bill for the year 2015 चे र.रु.२८,०९०/- अशी एकुण र.रु.५६,१८०/- वजा १०% आयकर र.रु.५६१८/- निव्वळ देय र.रु.५०,५६२/- अदा करावयाचे असल्याने होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१०३ विषय क्रमांक – १५
दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – स्थापत्य BSUP प्रकल्प
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/BSUPप्र/२८६/२०१५ दि.१/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

JnNURM-BSUP योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या अजंठानगर येथील A6 इमारतीचे पात्र लाभार्थ्यांना मा.महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या हस्ते सदनिका हस्तांतरण करणेचे कार्यक्रमास मंडप व्यवस्था करणेकामी मे.लालदीप कन्स्ट्रक्शन, पिंपरी यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.५०% कमी दराने काम करणेस तयार असलेने निविदा न मागविता व करारनामा न करता मंडप, व्यासपीठ व इतर व्यवस्थेसाठी केलेल्या कामाचे खर्चास र.रु.१,६९,५३३/- तसेच या कामासाठी सन

२०१५-१६ चे अंदाजपत्रकात स्वतंत्र तरतूद नसल्याने मागासवर्गीय झोपडपट्‌टी वासियांसाठी पुनर्वसन करणे या लेखाशिर्षाअंतर्गत पानांक ५३७, अ.क्र.२३ वर पिंपरी चिंचवड शहरातील घोषित झोपडपट्‌टीमध्ये झोपडपट्‌टी वासियांसाठी पुनर्वसन योजना राबविणे व घरे बांधणे या लेखाशिर्षातून तरतूद टाकणेस कार्योत्तर मान्यता देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१०४ विषय क्रमांक – १६

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – पशुवैद्यकिय

सुचक –मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पवै/०१/कावि/३२५/२०१५ दि.४/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

श्वानसंतती नियमन व शस्त्रक्रिया या कामासाठी प्रस्तावात नमूद प्राप्त तिन्ही निविदाधारकांचे र.रु.६४९/- प्रती श्वान असे लघुत्तम दर स्विकृत करुन त्यांचे समवेत करारनामा करणेस व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास १ वर्ष कालावधीकरीता मान्यता देणेत येत आहे. तसेच पशुवैद्यकीय विभागांतर्गत श्वानसंतती नियमन शस्त्रक्रिया करणेकामी कार्यरत मे.पिपल्य फॉर ऍनिमल पुणे व सोसायची फॉर ऍनिमल प्रोटेक्शन कोल्हापूर या दोन संस्थांची कामाची मुदत दि.१५/३/१५ रोजी संपली आहे. नविन संस्थेची नेमणुक होईपर्यंत या दोन्ही संस्थांना पुर्वीच्याच दराने म्हणजेच ररु.६७९/- (अक्षरी र.रु. सहाशे एकोणऐंशी फक्त) प्रति श्वान नर, मादी दराने कामकाज करणेकरिता मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावात मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१०५ विषय क्रमांक – १७

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – नगरसचिव

सुचक-मा.संपत पवार अनुमोदक-मा.धनंजय आल्हाट

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नस/३/कावि/१५६/२०१५ दि.३/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.सत्तारुढ पक्षनेता, यांचे वापरातील म.न.पा. वाहन क्र.MH-14-CL-0700 (टाटा मांझा) करीता पाच नग नविन ब्रिजस्टोन कंपनीचे ट्युबलेस टायर्स मे.दर्शन टायर्स चिंचवड यांच्याकडून निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणारे र.रु.२४,२००/- अथवा होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१०६ विषय क्रमांक – १८

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – नगरसचिव

सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नस/३/कावि/१५५/२०१५ दि.३/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.विरोधी पक्षनेता, यांचे वापरातील म.न.पा. वाहन क्र.MH-14-CL-0321 (टाटा मांझा) करीता चार नग नविन ब्रिजस्टोन कंपनीचे ट्युबलेस टायर्स मे.दर्शन टायर्स चिंचवड यांच्याकडून निविदा न

मागविता, करारनामा न करता थेट पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणारे र.रु.१९,४५०/- अथवा होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१०७ विषय क्रमांक – १९
दिनांक – ०४/०८/२०१५
सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक–मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

मा.क्रीडा समिती सभा सदस्य ठराव क्र.११६ दि.१७/७/२०१५ अन्वये पिंपळे निलख येथील प्रभाग क्र. ५४ मधील भांडे इमारतीमधील व्यायामशाळा अनेक दिवसांपासून बंद स्थितीत आहे. तरी नवयुग मित्र मंडळ (श्री कुणाल सुर्वे) या संस्थेस देखभाल संरक्षण चालनकामी देण्यास मान्यता दिलेली आहे. सबब प्रभाग क्र.५४, पिंपळे निलख येथील भांडे इमारतीमधील व्यायामशाळा नवयुग मित्र मंडळ या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा र.रु.२०००/- म.न.पा. कडून सेवा शुल्क देऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१०८ विषय क्रमांक – २०
दिनांक – ०४/०८/२०१५
सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक–मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

सेक्टर २१, यमुनानगर येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा मिनाताई ठाकरे जलतरण तलाव आहे. जलतरण तलाव परिसरात बॅडमिंटन हॉल, सभागृह, जॉगिंग ट्रॅक आहे. त्यामुळे याठिकाणी नागरीक भरपूर प्रमाणावर येतात. परंतू याठिकाणी येणा-या नागरीकांना चहा व नाष्ट्याची सोय नसल्याने तेथे उपहारगृहाची आवश्यकता आहे.

पुर्वी सदरचा जलतरण तलाव बी.ओ.टी. तत्वावर चालविण्यास देण्यात आला होता. त्यावेळी तेथे उपहारगृहाची व्यवस्था होती. परंतू गेल्या ६ ते ७ वर्षांपासून हा तलाव न्यायालयीन वादामुळे बंद होता तो परत सुरु झाला आहे. यमुनानगर महिला आघाडी या ठिकाणी बंद असलेले उपहारगृह पुन्हा सुरु करण्यास इच्छुक आहे. तरी महापालिकेच्या नियम, अटी व शर्तीनुसार व मा.उपसंचालक-नगररचना विभाग ठरवतील त्या भाडेदराने ११ महिन्यांकरिता सदरचे उपहारगृह यमुनानगर महिला आघाडी यांना चालविण्यास देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१०९ विषय क्रमांक – २१
दिनांक – ०४/०८/२०१५
सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक–मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

क क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील मौजे सांगवी प्रभाग क्र.६३ कासारवाडी येथील कॉंक्रीट रस्ते करणे प्र.क्र.५८ नवी सांगवी येथील रस्ते मॉडेल वॉर्ड पद्धतीने विकसीत करणे. मनपा अंदाजपत्रकात आवश्यक

तरतुद केलेली आहे. तरी खालील रस्त्यांकरीता सल्लागार म्हणून नेमणूक करणे आवश्यक आहे. वरील रस्ते विकसीत करणेबाबत सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात वरील कामांचा समावेश केला आहे. वरीलप्रमाणे विकास आराखड्यातील विविध रस्त्यांचे महानगरपालेकेच्या मंजुर स्टॅन्डर्ड क्रॉस सेक्शन नुसार रस्ते विकसीत करण्याचे काम करण्यासाठी सल्लागार यांचेमार्फत सर्व्हे करणे, रस्त्यातील विविध सेवा वाहिन्यांचे (पाणीपुरवठा, जलनिःसारण, विद्युत, ऑप्टिकल फायबर, म.रा.वि.वि.कं., दुरसंचार इ) स्थलांतर करुन नियोजित मागणीनुसार विकसीत करणे व स्थापत्य विषयक कामांच्या बाबींचे पुर्वगणनपत्रक तयार करणे व निविदा बनविणेसह कामाची देखरेख करणे, इ. निविदा पुर्व (Pre Tender Activity) व निविदा पश्चात (Post Tender Activity) कामे करावी लागणार आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपरोक्त संबंधित अशा विविध प्रकल्पांसाठी सल्लागार मे.पेव्हटेक कन्सल्टंट यांनी काम केले आहे. तसेच महानगरपालिकेच्या विविधा रस्त्यांसाठी व बी.आर.टी.एस. रस्त्यांसाठी मे.पेव्हटेक कन्सल्टंट यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली कामे प्रगतीपथावर आहेत. या बाबींचा विचार करता उपरोक्त विषयाकामी मे.पेव्हटेक कन्सल्टंट (श्री. विकास ठक्कर) यांची सल्लागार म्हणून नेमणूक करुन मनपाच्या प्रचलित दरानुसार निविदा पुर्व (Pre Tender Activity) व निविदा पश्चात (Post Tender Activity) साठी स्विकृत निविदा किंमतीच्या (Accepted Tender Cost) ०.८०% व निविदा पश्चात (Post Tender Activity) साठी १.४५% फी अधिक सेवाकर (Service Tax) इ. मनपाच्या नियमानुसार देणेबाबत ठराव मंजुर करुन सदर कामाचे नियोजन करणेबाबत आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२११० विषय क्रमांक – २२
दिनांक – ०४/०८/२०१५
सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक–मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

मनपाचे पिंपरी येथील कै.हरीभाऊ दिनाजी वाघेरे उद्यान देखभाल व संरक्षणाचे कामकाज निविदा नो.क्र.१४,२०१४-१५ बाब क्र.७ अन्वये निविदा काढणेत आली होती. सदर निविदा ठराव क्र.११९३१ दि.७/७/२०१५ अन्वये फेटाळणेत आली आहे. तरी सदर उद्यानाची देखभाल व संरक्षण करणे आवश्यक असलेने सध्या देखभालीचे कामकाज करत असलेली पिंपरी येथील स्थानिक संस्था मे.समर्थ इन्फ्रास्ट्रक्चर यांना निविदा नो.क्र.१४ बाब क्र.७ चे मंजुर दरानुसार दोन वर्ष कालावधीसाठी देणेस व त्यासाठी येणारा खर्च र.रु.६,६७,७८७/- यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१११ विषय क्रमांक – २३
दिनांक – ०४/०८/२०१५
सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक–मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

सांगवी जलतरण तलाव येथील मोकळ्या हॉलमध्ये नागरीक व खेळाडूंसाठी १५ नग कॅरम स्टँडर्डसाईज (इंग्लिशप्लाय) व ७५ नग प्लॅस्टीक खुर्च्या निविदा न मागविता कोटेशन पद्धतीने खरेदी करुन उपलब्ध करुन देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास (र.रु.१,८०,०००/- पर्यंत) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२११२ विषय क्रमांक – २४

दिनांक – ०४/०८/२०१५

सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक–मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

मनपाच्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकातील विशेष योजनेतील प्रस्तावात नमूद केलेल्या कामात वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी. (वाढ/घट र.रु.८,००,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२११३ विषय क्रमांक – २५

दिनांक – ०४/०८/२०१५

सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक–मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे क क्षेत्रीय कार्यालय व मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमूदप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.१३,३५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२११४ विषय क्रमांक – २६

दिनांक – ०४/०८/२०१५

सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक–मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमूदप्रमाणे तरतूद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.४,८०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२११५ विषय क्रमांक – २७

दिनांक – ०४/०८/२०१५

सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक–मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

ड मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२११६ विषय क्रमांक – २८

दिनांक – ०४/०८/२०१५

सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक–मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

क प्रभाग व क मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१९,९५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – १२११७ विषय क्रमांक – २९
दिनांक – ०४/०८/२०१५
सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक–मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

क प्रभाग व क मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१२,५४,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२११८ विषय क्रमांक – ३०
दिनांक – ०४/०८/२०१५
सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक–मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

फ प्रभाग मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.४,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२११९ विषय क्रमांक – ३१
दिनांक – ०४/०८/२०१५
सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक–मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

अ प्रभाग व अ मुख्यालयाकडे सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये केलेल्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३,१०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१२० विषय क्रमांक – ३२
दिनांक – ०४/०८/२०१५
सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक–मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

ड मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामधील विशेष योजना कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१२१ विषय क्रमांक – ३३
दिनांक – ०४/०८/२०१५
सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक–मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

ड मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामधील विशेष योजना कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – १२१२२ विषय क्रमांक – ३४

दिनांक – ०४/०८/२०१५

सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक–मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

ड मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.५२,१६,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१२३ विषय क्रमांक – ३५

दिनांक – ०४/०८/२०१५

सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक–मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

ड मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकातील भांडवली व विशेष योजना कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.४७,५४,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१२४ विषय क्रमांक – ३६

दिनांक – ०४/०८/२०१५

सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक–मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.कैलासभाऊ थोपटे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

ड मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकातील प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव मधील भांडवली व विशेष योजना कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.५२,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२१२५ विषय क्रमांक – ३७

दिनांक – ४/०८/२०१५

सुचक –मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक –मा.शांताराम भालेकर

संदर्भ :- मा.कैलासभाऊ थोपटे व मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र. ११७०२ दिनांक ९/६/२०१५ रद्द करणेत येवून पिं.चिं.म.न.पा.च्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामाच्या तरतुदीमध्ये वाढ, घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.,१६,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२१२६ विषय क्रमांक – ३८

दिनांक – ४/०८/२०१५

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक –मा.शांताराम भालेकर

संदर्भ :- मा.कैलासभाऊ थोपटे व मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र. ११७०२ दिनांक ९/६/२०१५ रद्द करणेत येवून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामाच्या तरतुदीमध्ये वाढ, घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.,३,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२१२७ विषय क्रमांक – ३९

दिनांक – ४/०८/२०१५

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक –मा.शांताराम भालेकर

संदर्भ :- मा.कैलासभाऊ थोपटे व मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र. १२०३० दिनांक २१/७/२०१५ रद्द करणेत येवून मनपाचे सन २०१५-१६ च्या मुळ अंदाजपत्रकात प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामाच्या तरतुदीमध्ये वाढ, घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.५.०० लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२१२८ विषय क्रमांक – ४०

दिनांक – ४/०८/२०१५

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक –मा.शांताराम भालेकर

संदर्भ :- मा.कैलासभाऊ थोपटे व मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र. १२०४६ दिनांक २१/७/२०१५ रद्द करणेत येवून महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामाच्या तरतुदी वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु. ८,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१२९ विषय क्रमांक – ४१

दिनांक – ४/०८/२०१५

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक –मा.शांताराम भालेकर

संदर्भ :- मा.कैलासभाऊ थोपटे व मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र. १२०२४ दिनांक २१/७/२०१५ रद्द करणेत येवून महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे स्थापत्य इ क्षेत्रीय विभागाअंतर्गत कामाच्या तरतुदी वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु. ८,७५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२१३० विषय क्रमांक – ४२

दिनांक – ४/०८/२०१५

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक –मा.शांताराम भालेकर

संदर्भ :- मा.कैलासभाऊ थोपटे व मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र. १२०४१ दिनांक २१/७/२०१५ रद्द करणेत येवून इ क्षेत्रीय कार्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामाच्या तरतूदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु. १,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –१२१३१ विषय क्रमांक – ४३

दिनांक – ४/०८/२०१५

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक –मा.शांताराम भालेकर

संदर्भ :- मा.कैलासभाऊ थोपटे व मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र. १२०४५ दिनांक २१/७/२०१५ रद्द करणेत येवून क प्रभाग व क मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामाच्या तरतूदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु. ४,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२१३२ विषय क्रमांक – ४४

दिनांक – ४/०८/२०१५

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ :- मा.कैलासभाऊ थोपटे व मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...

पिं.चिं.म.न.पा.च्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामाच्या तरतुदीमध्ये वाढ, घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.५९,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१३३ विषय क्रमांक – ४५

दिनांक – ४/०८/२०१५

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक –मा.शांताराम भालेकर

संदर्भ :- मा.कैलासभाऊ थोपटे व मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

ड क्षेत्रीय कार्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामांच्या तरतूदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु. ४२,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१३४ विषय क्रमांक – ४६

दिनांक – ४/०८/२०१५

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक –मा.शांताराम भालेकर

संदर्भ :- मा.कैलासभाऊ थोपटे व मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र. ११७०३ दिनांक ९/६/२०१५ रद्द करणेत येवून ड क्षेत्रीय कार्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामांच्या तरतूदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु. १०,२५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२१३५ विषय क्रमांक – ४७

दिनांक – ४/०८/२०१५

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक –मा.शांताराम भालेकर

संदर्भ :- मा.कैलासभाऊ थोपटे व मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संभाजीनगर प्रभाग क्र.९ मधील निसर्गकवी बहिणाबाई चौधरी सर्पोद्यानात सालाबादप्रमाणे यावर्षीही नागपंचमी साजरी केली जाणार असुन गेली २० वर्षे या

सणामध्ये महिलांसाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याने येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१३६ विषय क्रमांक – ४८

दिनांक – ४/०८/२०१५

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक –मा.शांताराम भालेकर

संदर्भ :- मा.संध्या गायकवाड व मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

मनपाचे उद्यान विभागात हार,फुले,गुच्छ इत्यादी साहित्य पुरविणेबाबत निविदा नो.क्र.११,२०१३-१४ अन्वये निविदा काढणेत आली होती. सदर निविदा मजुर दरानुसार पुढील एक वर्ष कालावधीसाठी मे. श्री.गणेश पुष्प भांडार यांना मुदतवाढ देणेस व त्यासाठी येणा-या र.रु.९,७५,६००/-चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२१३७ विषय क्रमांक – ४९

दिनांक – ४/०८/२०१५

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक –मा.शांताराम भालेकर

संदर्भ :- मा.कैलासभाऊ थोपटे व मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

जलशुध्दीकरण केंद्र से.२३ आवारामध्ये मनपा कर्मचा-यांची निवासस्थाने असुन सदर निवासस्थानांकरीता म.रा.वि.वि.कं. तर्फे विज मिटर घेण्यात आलेले होते. विज देयकांचा भरणा हा कर्मचा-यांमार्फत करण्यात येत होता. तथापी सदर निवासस्थानामध्ये वास्तव्य करणा-या कर्मचा-यांतर्फे विज देयकांचा भरणा करण्यात आलेला नसल्याने विज मिटर P.D. (Permant Disconnect) करण्यात आलेले आहेत. सदर P.D. (Permant Disconnect) करण्यात आलेल्या विज मिटरची एकूण थकबाकीची रक्कम रु.३,००,०००/- इतकी असुन सदर थकबाकीची अदायगी म.रा.वि.वि.कं. यांना करणे अद्याप बाकी आहे.

निवासस्थानांच्या एकूण ३ इमारती असुन त्यामध्ये एकूण ३२ सदनिका आहेत. सदर इमारतींपैकी पहिल्या इमारतीमध्ये एकूण ८ सदनिका असुन ही इमारत BRTS चे मार्गामध्ये बाधीत असल्याने पाडण्यात येणार आहे. या कारणास्तव इमारतीमध्ये वास्तव्य करणा-या कुटुंबांचे शेजारील इमारतीमध्ये स्थानांतर करणे आवश्यक आहे. स्थानांतर करणेचे आधी स्थानांतरण करण्यात येणा-या ठिकाणी विज मिटर घेणे आवश्यक आहे. या करीता प्रथम मागील थकबाकीची रक्कम रु.३,००,०००/- म.रा.वि.वि.कं. यांना अदा करणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी विज वापर वैयक्तिक स्वरुपाचा असल्याने त्याबाबतचा भरणा संबंधित कर्मचा-यांकडून करण्यात येत होता, तसेच या संपुर्ण प्रक्रियेवर भुमी आणि जिंदगी विभागातर्फे नियंत्रण ठेवण्यात येत होते.

१. निवासस्थानाचे नियंत्रण हे भुमी आणि जिंदगी विभागाचे असल्यामुळे मागील थकबाकी रकमेची वसुली ही बाब संपुर्णपणे भुमी आणि जिंदगी विभागाशी संबंधित आहे. तातडीची बाब म्हणून विज देयकांच्या थकबाकीचा भरणा विद्युत विभागातर्फे करण्यात यावा. परंतु याबाबत लेखापरीक्षणात घेण्यात येणा-या आक्षेपांची पुर्तता करण्याची जबाबदारी ही पुर्णपणे भुमी आणि जिंदगी विभागाची राहील.

२. नवीन विज मिटर जोड घेतल्यानंतर सदर विजमिटरच्या मासिक विज देयकाची अदायगी विद्युत विभागामार्फत करण्यात येईल व त्याबाबतचा पुर्तता अहवाल भुमी आणि जिंदगी विभागाकडे सादर करण्यात येईल व त्यानंतर सदर देयकाच्या रकमेची वसुली ही संबंधित कर्मचा-याच्या मासिक वेतनामधून करण्याची तसेच त्याबाबत लेखापरीक्षणामध्ये येणा-या संभाव्य आक्षेपांची पुर्तता करणेची जबाबदारी भुमी आणि जिंदगी विभागाची राहील.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२१३८ विषय क्रमांक – ५०
दिनांक – ४/०८/२०१५
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक –मा.सविता साळुंके
संदर्भ :- मा.कैलासभाऊ थोपटे व मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामांच्या तरतूदीमध्ये वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ र.रु. ५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/७६/२०१५
दिनांक - ०५/०८/२०१५

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.